कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/काविवि/रा.पु.भ.स्प/२०२१-२२/१५२९
दि.०५/१०/२०२१

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमी आयोजित पं.मनोहरबुवा शिरगांवकर स्मृती पुरुष कलाकारांची राज्यस्तरीय भजन स्पर्धा रविवार दि. १० ऑक्टोबर २०२१ रोजी सकाळी १०.०० वाजल्यापसून राजीव गांधी कला मंदिर, फोंडा येथे निश्चित करण्यात आली असून यात विभागीय स्पर्धेतील ५ केंद्रावरुन निवडण्यात आलेली एकूण १० पथके सहभागी होणार आहेत.

त्यात १. श्री दाडेश्वर कला केंद्र, नादोडा-बार्देश , २. श्री भगवती चिंबलकरीन भ. मं., चिंबल-तिसवाडी, ३.श्री रामपुरुष आदिनाथ भ. मं., उसगाव-फोंडा, ४.श्री वाठारेश्वर कला क्रिडा आणि सांस्कृतिक मं., न्हावेली-साखळी, ५.श्री विठ्ठल रखुमाई भ. मं., उदळशे-साकोर्डा, ६.श्री शारदा संगीत विद्यालय-वास्को,७. श्री शंकरनाथ भ. मं., चरावणे-सत्तरी, ८.स्वर साधना कला व सांस्कृतिक संस्था, करंजाळ-मडकई, ९.श्री सातेरी कला आणि सांस्कृतिक मं., विर्नोडा-पेडणे व १०. श्री साई सातेरी आजोबा भ. मं., केरी-सत्तरी या पथकांचा समावेश आहे.

राज्यस्तरीय स्पर्धा संपल्यानंतर लगेच सायं. साधारणत: ७.०० वा. पारितोषिक वितरण समारंभ होणार असून गोवा राज्याचे सन्माननीय मुख्यमंत्री, डॉ. प्रमोद सावंत हे प्रमुख पाहुणे तर फोंडा मतदार संघाचे आमदार, श्री रवी नाईक हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहाणार असून कला व संस्कृती मंत्री व कला अकादमीचे अध्यक्ष श्री. गोविंद गावडे हे या समारंभाचे अध्यक्षस्थान भुषविणार आहेत. सदर समारंभात विभागीय व राज्यस्तरावरील स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहेत.

राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होणा-या १० ही पथकानी आपल्या सर्व सहकलाकारासह पुर्वतयारीनिशी १० ऑक्टोबर २०२१ रोजी आपल्या सादरीकरणाच्या किमान १ तास अगोदर राजीव गांधी कला मंदिर, फोंडा येथे उपस्थित राहाणे आवश्यक आहे. स्पर्धेला सकाळी ठिक १०.०० वाजता प्रारंभ होणार असून सादरीकरणाचा निश्चित करण्यात आलेला अनुक्रम न पाळणा-या पथकांना भजन सादर करु दिले जाणार नाही व सदर पथक स्पर्धेतून बाद ठरविण्यात येईल, याची सर्व पथकांची नोंद घ्यावी.

सभागृहात कलाकार, परिक्षक आयोजक व प्रेक्षक धरुन ५० टक्के उपस्थितीत हि स्पर्धा होणार असून कोविड-१९ च्या सर्व मार्गदर्शक तत्वांचे पालन करुन सर्वानी सहकार्य करावे असे आवाहन कला अकादमीने केले आहे.

( श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति
१. गोमंतक २. नवप्रभा ३. तरुण भारत ४. पुढारी ५. लोकमत
६. दै. हेराल्ड ७. गोवनवार्ता ८. आकाशवाणी पणजी केंद्र ९. दै. भांगरभूंय